Regd. No. MH323/2012

# Agro Inputs Manufacturers Association
(of india)

प्रति, दि.०१.१२.२०१५

मा. विकास देशमुख साहेब
कृषी आयुक्त महाराष्ट्र शासन,
मध्यवर्ती भवन, पुणे.

विषय:- बिगर नोंदणीकृत उत्पादने निर्मिती व विक्री बाबत.

संदर्भ : अ) महाराष्ट्र शासनाने दि. १६.०८.२०१० रोजी या संदर्भात काढलेला जी. आर.

ब) मागील काही पंधरवड्यात ॲग्रोवन या कृषीप्रधान वर्तमान पत्रामध्ये बिगर नोंदणीकृत जैविक बोगस उत्पादनाचे जग या मथळ्याखाली सलग आठवडाभर प्रकाशीत झालेली मालीका.

क) "ॲग्रोवन" मध्ये प्रकाशीत झालेल्या मालीकेनंतर कृषी खात्यातील कर्मचाऱ्यांनी वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये सुरू केलेली कारवाई.

महोदय,

वरिल विषय व संदर्भानुसार आम्ही आपणास विनंती पूर्वक निवेदन करीत आहोत, आपल्या देशात कृषी व्यवसायाच्या माध्यमातून मागील अनेक वर्षापासून शासनाच्या कृषीविषयक कायद्यामध्ये अंर्तभूत होणारी अनेक कृषीनिविष्ठांचे उत्पादन व विक्री हा व्यवसाय सुरू आहे. ज्या निविष्ठा भारतातील इनसेक्टीसाईड ॲक्ट व फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर या अंर्तगत येणाऱ्या नियमांमध्ये समाविष्ट नाहीत, अशी अनेक उत्पादने ज्याला बिगर नोंदणीकृत उत्पादने असे संबोधले जाते अशा उत्पादनांचा व्यवसाय केला जात आहे. या माध्यमातून काही उत्पादक शेतकऱ्यांची फसवणुक करतात, अशा प्रकारची तक्रार आल्याने महाराष्ट्र शासनाने १६ ऑगस्ट २०१० रोजी एक जी. आर. काढुन या बिगर नोंदणीकृत उत्पादनाच्या व्यवसायासाठी एक नियमावली तयार केली आहे.

Received
2/12/15

निर्देश
आयुक्त कृषि यांचेकडे
कृषि आयुक्तालय, म. रा.

Office Adderss : Chhatrapati Shivaji Market Yard, Shop No.6, 1st Floor. Madhyavarti Bhavan, Gultekdi, Pune- 411037
Ph-020-24274482 Email- info@aimassociationindia.com. Website-www.aimassociationindia.com

हा जी. आर. आल्यानंतर अशा प्रकारचे बिगर नोंदणीकृत उत्पादने तयार करणारे उद्योजक एकत्र येऊन त्यांच्या काही संघटना स्थापण झाल्या.त्यामध्ये या क्षेत्रातील बहुसंख्य उद्योजक समाविष्ट असणारी आमची "ॲग्रो इनपुटस मॅन्युफॅक्चरस् असोसिएशन" ही एक आहे. आमची संघटना सोडुन बाकी छोट्या स्वरूपात असणाऱ्या दोन संघटना या जी. आर. विरोधात कोर्टामध्ये गेल्या आता हा विषय न्यायप्रविष्ठ आहे. मात्र आमच्या संघटनेने या जी. आर. चे स्वागत करून या जी. आर. च्या माध्यमातून ही बिगर नोंदणीकृत उत्पादने शासनाने ठरवून दिलेल्या नियमांमध्ये आणण्यास आपल्या खात्यास सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यानंतर या जी. आर.संदर्भात स्थापन केलेल्या कमिटीमध्ये आम्हाला निमंत्रीत सद्स्य म्हणुन सामाविष्ट करण्यात आले. तेव्हापासुन या जी. आर. च्या अमंलबजावणी संदर्भात अनेक मिंटीग झाल्या . आम्ही त्या सर्व मिंटीगला हजर राहुन या संदर्भात या समितीला आवश्यक असणारी विविध माहीती पुरविण्याचे अत्यंत महत्वाचे काम आम्ही केले आहे, याच बरोबरच आपल्या खात्याच्या परवानगीने विविध विद्यापिठातील संशोधन केंद्रामध्ये निविष्ठांची चाचणी, प्रात्यक्षिक मागील दोन वर्षापासून घेण्याचे काम सुरू आहे.

आमची संघटना अशा प्रकारे नियमाअंर्तगत आपल्या खात्यासोबत राहून काम करीत असताना बाकी इतर व्यवसाईक या बिगर नोंदणीकृत उत्पादनास परवाना लागत नसल्याने विविध माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणुक करित असल्याच्या तक्रारी आल्याने "ॲग्रोवन दैनिकाने" या बाबत लेखमाला प्रकाशित केली. परंतु त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये काहिंशी संभ्रमाची स्थिती निर्माण झाली, कारण ही लेखमाला प्रकाशित करत असताना त्यामध्ये या सर्व उत्पादनास त्यांनी एकाच कॅटेगिरिमध्ये म्हणजे "बिगर नोंदणीकृत उत्पादने" असा उल्लेख केल्याने शेतकरी बांधव या सर्वच उत्पादनास बोगस समजू शकेल अशी चिंता आम्हाला वाटत आहे.

तसेच या लेखमालेचा संदर्भ घेऊन आपल्या खात्यातील अधिकारी पेपर मध्ये वेगवेगळे स्टेटमेंट देत असल्याने सध्या आमच्या कृषी उत्पादन व्यवसायामध्ये काहिंशी गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांनी नाशिक व सांगली या ठिकाणी मिटींग घेऊन विक्रेत्यांना सरसकट सर्वच बिगर नोंदणीकृत उत्पादनाची विक्री करू नये, शिवाय ती आपल्या दुकानात ठेवू नये असे तोंडी आदेश दिल्याने बरेचशे उत्पादक त्यांना आम्ही विक्रीसाठी दिलेली उत्पादने आम्हाला परत घेऊन जा असे सांगत आहेत. या अशा प्रकारामुळे प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या आमच्या असोसिएशन मधील सदस्याचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तरी कृपया आम्ही आपणाकडे खालीलप्रमाणे मागणी करीत आहोत.

१) **बाजारातील बोगस जैविक किटकनाशके विक्री रोखावी. अशा उत्पादका विरूद्ध कठोर कारवाई करावी.**

२) **बाजारामध्ये जैविक नावाखाली काही उत्पादक रासायनिक किडनाशक घटक मिसळून शेतकऱ्यांची फसवणुक करित आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.**

३) **जे उत्पादक प्रामाणिकपणे बिगर नोंदणीकृत योग्य उत्पादनाचा व्यवसाय करत आहेत त्यांना त्यांचा व्यवसाय करण्यास आडकाठी आणली जाऊ नये.**

४) **आपल्या कमिटीच्या माध्यमातुन ज्या १५ उत्पादनांची निवड करण्यात आली आहे आणि विचाराधीन असलेल्या सात उत्पादनास लवकरात लवकर उत्पादन व विक्रीचा परवाना अथवा ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. (सोबत यादि जोडली आहे.)**

५) **आपल्या खात्यातील कर्मचाऱ्याच्या माध्यमातून प्रामाणिकपणे योग्य मार्गाने व्यवसाय करणाऱ्या बिगर नोंदणीकृत उत्पादने उत्पादक व विक्रेत्यास नाहक त्रास होवू नये, याची आपण दखल घ्यावी.**

तरी कृपया वरील निवेदनाचे अवलोकन करून यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती.

धन्यवाद!

आपले विश्वासू,

समीर पाथरे
सचिव,
ॲग्रो इन्पुटस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

राजकुमार धुरगुडे
अध्यक्ष,
ॲग्रो इन्पुटस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

Agro Inputs Manufacturers Association of India
Reg. No.

| Sr. No. | | Product | Form | Content | % | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| B | 1 | Nitrobenzene | Liquid | Nitrobenzene | 20 | सदरचे उत्पादनास केंद्र शासनाच्या सीआयबी आरसी व केंद्रीय खत समितीच्या निर्णयाच्या अधिन राहुन स्वतंत्र निर्णय घेणे |
| | 2 | Nitrobenzene | Granular | Nitrobenzene | 1.5 | सदरचे उत्पादनास केंद्र शासनाच्या सीबीआय व केंद्रीय खत समितीच्या निर्णयाच्या अधिन राहुन स्वतंत्र निर्णय घेणे |
| C | 1 | protein Hydrolysate | Granular | protein Hydrolysate | 1.5 | अमान्य |
| | 2 | protein Hydrolysate | powder | protein Hydrolysate | 50 | अमान्य |
| | 3 | Bordeaux powder | powder | copper Sulphate | 8 | अमान्य |
| | 4 | Bordeaux | Liquid | copper Sulphate | - | अमान्य |
| D | 1 | Soil Conditioner | Soil application | Ca: mg: s | 10:05:10 | खत नियंत्रण आदेशात समावेश |
| | 2 | Soil Conditioner | Soil application | Ca: mg: s | 8:06:06 | खत नियंत्रण आदेशात समावेश |
| E | 1 | Sticking agent | Tonic | Active matter | 5 | आवश्यकता नाही |
| | 2 | Spreading agent | Non ionic | Active matter | 5 | आवश्यकता नाही |

ब) खालील उत्पादनाबाबत निर्णय राखुन ठेवण्यात आला आहे.

| Sr. No. | | Product | from | content | % | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| F | 1 | Seaweed Extract | Liquid | Algenic acid | 1 | Hold |
| | 2 | Seaweed Extract | Granuler | Algenic acid | 1 | Hold |
| | 3 | Ca-sillicate | soil application | silica | 40 | Hold |
| | 4 | Organic manure | soil application | press mud cake. | - | Hold |
| | 5 | sulphur | liquid | sulphur | 5 | Hold |
| | 6 | K-salt of phosphonic acid | Liquid | phosphorus acid | 0 | Hold |
| | 7 | Ca chelate | powder | calcium | 9 | Hold |

Agro Inputs Manufacturers Association * Reg. No. ...